# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
(नॅक समिती तर्फे ''अ" दर्जा प्राप्त )

शैक्षणिक विभाग (०२४०)२४०३११८/२४०३११९
कुलसचिव (का.) २४०३३३४ (नि.)२४००२०३
फॅक्स :(०२४०) २४०३१२४, २४०३३३५
म.व.वि.वि.म. (का) (०२४०) २४०३२२३
Web Site-WWW.bamu.net
E-mail: bcud.office@bamu.ac.in

विद्यापीठ परिसर
औरंगाबाद-४३१००४
(महाराष्ट्र)

संदर्भ : शैक्ष /संलग/स्था. मा./२०१८-२०१९/ 12808 दिनांक:- २४-०१-२०१९

**प्रति,**
सर्व संलग्नीत महाविद्यालय,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

विषयः- **शैक्षणिक मुल्यांकन (Academic Audit) करणे बधंनकारक असल्याबाबत.**
**संदर्भः- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नियम ११७.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय नियमानुसार संलग्नीत महाविद्यालयाचे प्रत्येक तीन वर्षातुन किमान एकदा शैक्षणिक मुल्यांकन तपासणी करणे बंधन कारक आहे.

या अनुषंगाने विद्यापीठने संकेतस्थळावर महाविद्यालयाचे शैक्षणिक मुल्यांकन करण्याचा फॉर्म उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

सदरील मुल्याकंन फॉर्म दिनांक-५-०२-२०१९ पर्यत विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात सर्व दस्तऐवजां सहीत हार्डकॉपी सादर करावी आणि सॉप्ट कॉपी ही **dyregistrar.acad@bamu.ac.in** या मेलवर सादर करणे बंधन कारक आहे.

एकदा भरलेला फॉर्म हा किमान तीन वर्ष वैध गणण्यात येणार आहे.

महाविद्यालयाचे शैक्षणिक मुल्यांकन करण्यास्तव रुपये २००००/- शुल्क आकरण्यात येते आहे.सदरील शुल्क कुलसचिव,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद, यांचे नावे बॅक ऑफ महाराष्ट्र शाखा क्र.१५२ आयएसफ कोड MAHB ००००१५२ येथेल खाते क्र.६०१४५३३०३२३ या खात्यांवर RTGS द्वारे जमा करुन चलनाची प्रत लेखा विभागात दर्शवुन लेखा विभागाची शुल्क भल्याची पावती फॉर्म सोबत जोडणे आवश्यक आहे.

महाविद्यालयाकडुन प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करण्यात येऊन,गठीत शैक्षणिक मुल्यांकन समिती महाविद्यालयास तपासणीस प्रत्यक्ष भेट दिनांक १५ फेब्रुवारी ते १५ मार्च २०१९ दरम्यान देणार असुन सदरील समिती भेटीचे वेळापत्रक दि.१० फेब्रुवारी २०१९ रोजी विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. सदरील सदस्यांचे प्रवास आणि दैनिक भत्ता महाविद्यालयाकडुन आकारण्यात आलेल्या शुल्का मधुन विद्यापीठ अदा करणार आहे.

आपला विश्वासु

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

या पत्राची प्रत, मा.वित्त व लेखा अधिकारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ,औरंगाबाद, यांना देण्यात येऊन कळविण्यात येते की उपरोक्त पत्रातील संदर्भानुसार या विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयाचे शैक्षणिक मुल्यांकन करण्यातची कार्यवाही सुरु करण्यात आलेली असुन,सर्व महाविद्यालयाकरीता रुपये २००००/- शैक्षणिक मुल्यांकन शुल्क आकारण्यात येणार आहे.सदरील शुल्क योग्य त्या लेखाशिर्षाअंतर्गत जमा करण्याची योग्य ती कार्यवाही करावी ही विनंती.

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)